# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दि. 2 फेब्रुवारी 2025 | पान- 1


# शहरामध्ये निर्जंतुकीकरण करुनच पाणीपुरवठा

## नागरिकांनी खोट्या 'एसएमएस' वर विश्वास ठेऊ नये : महापालिका जलशुध्दीकरण केंद्राकडून आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरामध्ये जलशुध्दीकरण केंद्रातील फिल्टर मशीन बंद असल्याचा व त्यामध्ये बिघाड झाल्याचे 'एसएमएस' सध्या नागरिकांपर्यंत पोहोचत असून पाणी निर्जंतुकीकरण न करताच सोडण्यात येणार असल्याचेही त्याद्वारे सांगण्यात येत असल्याचे खोटे एसएमएस जाणीवपूर्वक पसरविण्यात येत असून अशी कोणतीही परिस्थिती नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.





> सध्या शहरामध्ये फिल्टर मशीन बंद असल्याचे व निर्जंतुकीकरण न करता पाणी सोडण्यात येणार असल्याचे 'एसएमएस' पाठविले जात असून यामध्ये कोणत्याही प्रकारे सत्यता नाही. जलशुध्दीकरण केंद्राकडून पाणी निर्जंतुकीकरणासाठी आवश्यक असणारी टी.सी.एल पावडर वापरण्यात येत आहे. नागरिकांना शुध्द पाणी मिळण्यासाठी जलशुध्दीकरण केंद्राकडून अत्यावश्यक प्रक्रियांचा अवलंब करुनच पाणी सोडण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांनी खोट्या माहितीवर विश्वास न ठेवता आपणास येणारे पाणी अशुध्द असल्याचा संभ्रम दूर करावा. सध्या पाठविल्या जाणाऱ्या खोट्या 'एसएमएस' पाठविणाऱ्याचा शोध घेवून संबंधितांवर सायबर गुन्हा दाखल करुन कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.
>
> **- प्रमोद ओंभासे, मुख्य अभियंता (१), पाणीपुरवठा विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जलशुध्दीकरण केंद्राकडून पाणी निर्जंतुकीकरण करुन विविध शास्त्रोक्त प्रक्रियांचे अवलंब करुनच शहरामध्ये पाणीपुरवठा केला जातो. महानगरपालिकेच्या जलशुध्दीकरण केंद्राकडून पाणी निर्जंतुकीकरणासाठी आवश्यक असणारी टी.सी.एल पावडर वापरण्यात येते.

नागरिकांना शुध्द पाणी मिळण्यासाठी जलशुध्दीकरण केंद्राकडून अत्यावश्यक प्रक्रियांचा अवलंब करण्यात येत असून शहरामध्ये जलशुध्दीकरण केंद्रातील फिल्टर मशीन बंद असल्याचा व त्यामध्ये बिघाड झाल्याचे 'एसएमएस' सध्या नागरिकांपर्यंत पोहोचत असून पाणी निर्जंतुकीकरण न करताच सोडण्यात येणार असल्याचेही त्याद्वारे सांगण्यात येत असल्याचे खोटे एसएमएस जाणीवपूर्वक पसरविण्यात येत असून अशी कोणतीही परिस्थिती नाही. जलशुध्दीकरण केंद्रातील फिल्टर हाऊस सुरु असून नागरिकांना शुध्द पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे, असे जलशुध्दीकरण केंद्राकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

---

# वेटलिफ्टिंग व रेसलिंग स्पर्धेत पीसीपी मुलांचा संघ विजेता

## पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निक मधील मुलांच्या संघाने प्रथम व द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले

**पिंपरी | प्रतिनिधी**

इंटर इंजीनियरिंग डिप्लोमा स्टुडन्ट स्पोर्ट्स असोसिएशन, डी.१ झोन च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वेटलिफ्टिंग व रेसलिंग स्पर्धेत पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निक (पीसीपी) मधील मुलांच्या संघाने प्रथम व द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.



राजगड पॉलिटेक्निक भोर, पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत पॉलिटेक्निकच्या विविध तेरा महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. यामध्ये मुलांच्या वेटलिफ्टिंग स्पर्धेत विजेते गौरांग राम विंचूरणे याने ७७ किलो वजनी गट, श्रेयश सचिन काकडे याने १०५ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक, शिवम कैलास बिरादार याने ५६ किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक, अमन विश्वंभर कांबळे याने ९४ किलो वजनी गटात द्वितीय पटकावला. वेटलिफ्टिंग मध्ये सोहम साळुंखे याने ५७ किलो गटात प्रथम क्रमांक, विकी सांगले ९७ किलो वजनी गटात प्रथम पटकावला.

कुस्ती स्पर्धेत ९७ किलो वजनी गटात विकी सांगळे यांनी प्रथम क्रमांक पटकावला तर ५७ किलो वजनी गटात सोहम साळुंखे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. विजेत्या स्पर्धकांना पंच सुधीर म्हाळसकर, पंच साठे, पंच गणेश, प्राचार्य डी. के. खोपडे, समन्वयक प्रा. एस. के. नाणवरे यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरवण्यात आले.

यशस्वी विद्यार्थी व संघ व्यवस्थापक प्रा. गणेश राजे, प्रा. चेतन चिमोटे, अतुल मराठे , डी. बी.सोरटे, राहुल पवार, ठाकरे सर, क्रीडा समन्वयक सुनिल जगताप, किशोर गव्हाणे, लक्ष्मी दरकुडे, प्राचार्या डॉ. विद्या बॅकोड यांचे पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, कार्यकारी संचालक डॉ. गिरिश देसाई यांनी अभिनंदन केले.

# जीबीएस वाढतोय! पुण्यात दोघांचा मृत्यू

## पिंपरी-चिंचवडमध्ये एका रुग्णाच्या मृत्यूची नोंद : राज्यातील एकूण रुग्णसंख्या 140 वर

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यात गुइलेन बॅरे सिंड्रोमच्या (जीबीएस) आणखी तीन रुग्णांचा मृत्यू झाला आहे. पुण्यात दोन तर पिंपरी-चिंचवडमध्ये एका रुग्णाच्या मृत्यूची नोंद झाली आहे. यामुळे राज्यात आतापर्यंत मृत्यू झालेल्या रुग्णांची संख्या पाच झाली आहे. दरम्यान, राज्यातील जीबीएसची रुग्णसंख्या १४० वर पोहोचली आहे.

पुण्यातील पूना हॉस्पिटलमध्ये ६० वर्षीय पुरूषाचा जीबीएसने शुक्रवारी सकाळी मृत्यू झाला. ते कल्पक होम (धायरी) येथील रहिवासी आहेत. त्यांना २३ जानेवारीला अतिसाराचा त्रास सुरू झाला. त्यानंतर त्यांच्या पायाला पक्षाघात झाला. त्यामुळे २७ जानेवारीला त्यांना पूना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान त्यांचा आज मृत्यू झाला. याचबरोबर ससून सर्वोपचार रुग्णालयात ६५ वर्षीय पुरूषाचा आज मृत्यू झाला. ते नांदेड गावातील रहिवासी आहेत. त्यांना १६ जानेवारीला ससूनमध्ये दाखल करण्यात आले होते. त्यांना दाखल केले त्यावेळी त्यांची प्रकृती चिंताजनक होती आणि पक्षाघात झाला होता. त्यांचा उपचारादरम्यान आज मृत्यू झाला.



पिंपरी-चिंचवडमधील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात पिंपळे गुरव परिसरातील एका ३६ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. ते कॅबचालक होते. त्यांना अशक्तपणा, ताप, खोकला असल्याने २१ जानेवारीला उपचारांसाठी दाखल करण्यात आले होते. त्यांना जीबीएसची बाधा झाल्याचे निदान झाले. त्यांच्यावर अतिदक्षता विभागात व्हेंटिलेटरवर उपचार सुरू होते. त्यांना न्यूमोनियाचीही लागण झाली. न्यूमोनियामुळे श्वास घेण्यास त्रास झाल्याने ३० जानेवारीला त्यांचा मृत्यू झाला.

राज्यात जीबीएसमुळे पहिला मृत्यू सोलापूरमध्ये नोंदविण्यात आला. धायरीतील रहिवासी असलेल्या ४० वर्षीय पुरूषाचा मृत्यू झाला होता. ते पुण्याहून सोलापूरला गेले होते. तिथे त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यानंतर ससून सर्वोपचार रुग्णालयात ५६ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला. त्या नांदोशीतील (किरकिटवाडी) रहिवासी होत्या. आता पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये दोन दिवसांत तीन रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. त्यामुळे राज्यातील जीबीएसमुळे मृत्यू झालेल्या रुग्णांची संख्या पाच झाली आहे.

### अतिदक्षता विभागात 45 रुग्ण

**» राज्यात आढळलेल्या एकूण १४० रुग्णांपैकी १११ रुग्ण रुग्णालयात दाखल आहेत. त्यातील ४५ जणांवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. याचबरोबर १८ रुग्ण व्हेंटिलेटरवर आहेत. राज्यभरात २५ रुग्णांना उपचार करून रुग्णलयातून घरी सोडण्यात आले आहे, अशी माहिती आरोग्य विभागाने दिली आहे.**

### मृत्यूची संख्या 5 वर

**» पुणे, पिंपरी चिंचवडमध्ये जीबीएसची रुग्णसंख्या वाढत आहे. हा खरंतर चिंतेचा विषय आहे. राज्याच्या आरोग्य विभागाकडून मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या असून त्याचे पालन जिल्ह्यांना करणे बंधनकारक करण्यात आले आहे. राज्यात जीबीएसमुळे पहिल्या मृत्यूची नोंद सोलापूरमध्ये झाली होती. त्यानंतर ससून सर्वोपचार रुग्णालयात ५६ वर्षाच्या महिलेचा मृत्यू झाला. आता पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये दोन दिवसांत तीन रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. त्यामुळे राज्यातील जीबीएसमुळे मृत्यू झालेल्या रुग्णांची संख्या ५ वर जाऊन पोहचली आहे.**

---

# चऱ्होली, हिंजवडीतून 95 ई-बस धावणार

## पीएमपीएमएलकडून चऱ्होली आणि हिंजवडी फेज दोन येथे ई बस डेपो होणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडकडून (पीएमपीएमएल) चऱ्होली आणि हिंजवडी फेज दोन येथे ई बस डेपो होणार आहे. यामधून ९५ ई बस सोडण्याचे नियोजन प्राथमिक टप्प्यात आहे. या ठिकाणी लवकरच ई-बस डेपो कार्यान्वित होणार आहे. या बस सुरू झाल्यास दोन्ही भागातील नागरिकांची गैरसोय देखील दूर होणार आहे.

चऱ्होली आणि हिंजवडी फेज-२ येथे डेपो झाल्यास ई-डेपोंची संख्या सात होणार आहे. नवीन सुरू करण्यात येणाऱ्या ई-बस डेपोमधून शंभर ई-बस सोडण्यासाठी मार्गाचे व कर्मचाऱ्यांचे नियोजन करण्याचे काम पीएमपीएमएलकडून सुरू करण्यात येत आहे.




शहरातील कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी आणि हरित ऊर्जेच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी पीएमपीएमएलकडून ताफ्यात पर्यायी इंधनावरील बस वापराला प्रोत्साहन दिले जात आहे. त्यानुसार ताफ्यात सीएनजी व ई-बस वाढविण्यावर भर दिला जात आहे.

पीएमपीएमएलच्या ताफ्यात ई-बसची अधिक संख्या दाखल होणार आहे. पुण्यासह पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना देखील त्याचा फायदा होणार आहे. पीएमपीएमएलच्या ताफ्यात टप्प्याटप्प्याने नवीन ६५० ई-बस दाखल होणार होत्या.

मात्र, चऱ्होली आणि हिंजवडी फेज २ ई-बस डेपोंचे काम एक ते दीड वर्षांपासून रखडले होते. त्यामुळे पीएमपीएमएलच्या ताफ्यात ई-बस दाखल होण्यास उशीर झाला. आता दोन्ही ई-डेपोंचे काम पूर्ण झाले असून, लवकरच येथून नवीन ई-बसची सेवा सुरू करण्यात येणार आहे.

> चऱ्होली आणि हिंजवडी फेज २ या ठिकाणचे ई-डेपो लवकरच सुरू केले जणार आहेत. या डेपोतून अनुक्रमे ३५ आणि ६० ई-बस सोडण्याचे नियोजन आहे. या बस कोणत्या मार्गावर सोडायच्या, याचे नियोजन सुरू करण्यात येत आहे.
>
> **- सतीश गव्हाणे, मुख्य वाहतूक व्यवस्थापक, पीएमपीएमएल.**

# कुदळवाडीत अवैध बांधकामे, पत्राशेडवरील कारवाई व्यापाऱ्यांच्या ठिय्यासमोर ठरली फोल

## कुदळवाडी आणि चिखली येथे अवैध बांधकामे आणि पत्राशेडवर कारवाईसाठी गेलेल्या पथकाला मोठ्या प्रमाणात विरोध करण्यात आला.

**पिंपरी | प्रतिनिधी**

कुदळवाडी आणि चिखली येथे अवैध बांधकामे आणि पत्राशेडवर कारवाईसाठी गेलेल्या पथकाला मोठ्या प्रमाणात विरोध करण्यात आला. गुरुवारी (३० जानेवारी) व्यापाऱ्यांनी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन केले. त्यामुळे देहू-आळंदी रस्त्यावर दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. जवळपास तीन तास नागरिकांनी रस्त्यावर ठिय्या मांडल्याने तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. पोलीस आणि महापालिका अधिकाऱ्यांनी व्यापाऱ्यांना समजावण्याचा प्रयत्न केला, मात्र तो अपयशी ठरला. अखेर कारवाई स्थगित करत महापालिकेच्या पथकाला माघारी फिरावे लागले.

चिखली आणि कुदळवाडी परिसरातील मोठमोठ्या भंगार गोदामांमध्ये वारंवार लागणाऱ्या आगीमुळे हा भाग संवेदनशील बनला आहे. त्यामुळे या परिसरातील अवैध बांधकामे आणि दुकाने हटवण्याची मागणी जोर धरू लागली होती. महापालिकेने या भागातील ५,००० अवैध व्यावसायिक आस्थापनांना ज्यामध्ये भंगार दुकाने, गोदामे, हॉटेल्स, बेकरी, पत्राशेड आणि वर्कशॉप्स आदींना नोटीस बजावल्या होत्या. या नोटिशीमध्ये १५ दिवसांच्या आत ही बांधकामे हटवण्याचे निर्देश देण्यात आले होते, अन्यथा ती पाडली जातील, असा इशारा देण्यात आला होता. व्यापाऱ्यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून, यावर १४ फेब्रुवारी रोजी सुनावणी होणार आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेनेही न्यायालयात आपला प्रतिवाद दाखल केला आहे.

१५ दिवसांची मुदत संपल्यानंतर महापालिकेने कारवाईचे नियोजन केले आणि पोलीस बंदोबस्तासाठी पत्र पाठवले. बुधवारपर्यंत कारवाईचे नियोजन झाले होते. गुरुवारी सकाळी महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या आठ पथकांनी कुदळवाडीत कारवाईस सुरुवात केली. त्यांच्यासोबत पोलीस दलही होते. मात्र, व्यापाऱ्यांना याची माहिती मिळताच त्यांनी देहू-आळंदी रस्त्यावर ठिय्या आंदोलन सुरू केले. एक हजारांहून अधिक व्यापारी रस्त्यावर उतरल्याने तणाव निर्माण झाला. पोलिसांनी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला, मात्र व्यापारी आपल्या मागण्यांवर ठाम राहिले. अखेर दुपारी १.३० वाजता महापालिकेच्या पथकाला माघारी फिरावे लागले. त्यानंतर व्यापारी आपल्या जागांवरून हटले आणि वाहतूक सुरळीत झाली.



### कामगारांवर बेरोजगारीचे संकट

» कुदळवाडी स्क्रॅप मार्केटमध्ये भीषण आग लागल्यानंतर पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने चिखली-कुदळवाडीतील स्क्रॅप गोडाऊन आणि उद्योगांवर कडक कारवाई करण्याचा निर्णय घेतला. मात्र, या निर्णयाचा फटका २०-२५ वर्षे प्रामाणिकपणे सर्व प्रकारचे कर भरून व्यवसाय करणाऱ्या उद्योजकांना बसत आहे. प्रशासनाने चिखली औद्योगिक क्षेत्रातील सुमारे २००० लघु उद्योगांना नोटीस पाठवून त्यांना १५ दिवसांत आपली बांधकामे हटवण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे या उद्योजकांसह येथे काम करणाऱ्या २० हजारहून अधिक कामगारांवर बेरोजगारीचे संकट ओढवले आहे.

### कोट्यवधींचा माल कुठे ठेवायचा?

» भंगार गोदामांमध्ये लाखो रुपयांचा माल साठवलेला असून, अनेक मोठ्या कंपन्यांसोबत करार झालेले आहेत. अशा परिस्थितीत व्यापाऱ्यांनी प्रश्न उपस्थित केला की, हा माल कुठे ठेवायचा? प्रशासनाने त्यांना पत्राशेड हटवण्यास सांगितले. मात्र व्यापाऱ्यांनी सांगितले की, त्यामुळे त्यांचा कच्चा माल खराब होईल, रंग बदलू शकतो आणि यंत्रसामग्रीचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे किलोमागे मोठा तोटा सहन करावा लागेल. व्यापाऱ्यांनी प्रशासनाकडे पर्यायी जागेची मागणी केली आहे. तसेच, त्यांनी सहा महिन्यांची मुदत वाढवण्याची विनंती केली आहे. या संदर्भात आयुक्तांशी चर्चा होणार असली तरी, सध्या मुदतवाढ देण्याचा कोणताही विचार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. प्रशासनाने पुन्हा कारवाई करण्याचा इशारा दिला असून, व्यापाऱ्यांनीही पुन्हा विरोध करण्याची तयारी दर्शवली आहे. त्यामुळे गुरुवारी झालेली बैठक कोणत्याही ठोस निष्कर्षाविना संपली.

> “अवैधरित्या पत्राशेड उभारून भंगार आणि अन्य व्यवसाय सुरू आहेत. या भागात वारंवार आगीच्या घटना घडल्या आहेत. अवैध पत्राशेड आणि बांधकामे हटवण्यासाठी १५ दिवसांची मुदत देण्यात आली होती. ही मुदत संपल्यानंतर व्यापाऱ्यांनी मुदतवाढीची मागणी केली. आम्ही व्यापाऱ्यांशी चर्चा करून पुढील कारवाई ठरवू.
>
> **- मनोज लोणकर, उपायुक्त, अतिक्रमण विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका**

---

# इच्छुक धास्तावले, पालिका निवडणुकीसंदर्भातील सुनावणी पुन्हा लांबणीवर

## महापालिकेच्या निवडणुका लवकरच होतील, अशी आशा निर्माण झाली होती मात्र, निवडणुकीसंदर्भात सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीची तारीख सतत पुढे ढकलली जात आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

तब्बल तीन वर्षे न झालेल्या पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुका लवकरच होतील, अशी आशा निर्माण झाली आहे. मात्र, निवडणुकीसंदर्भात सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीची तारीख सतत पुढे ढकलली जात असल्याने माजी नगरसेवकांसह इच्छुकांची धाकधूक वाढली आहे.

लोकसभेनंतर विधानसभा निवडणुका पार पडल्या आहेत. विधानसभा निवडणुकीत राज्यात भाजपसह महायुतीचा मोठा विजय झाला आहे. त्यामुळे रखडलेल्या महापालिका, जिल्हा परिषद, नगरपालिका व ग्रामपंचायत निवडणुका होतील, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. तसेच, सर्वोच्च न्यायालयातील ओबीसी आरक्षणासंदर्भातील सुनावणीसाठी लवकरात लवकर प्रयत्न करू, असेही ते म्हणाले होते.

महापालिका निवडणुकीसंदर्भात सर्वोच्च न्यायालयात 22 जानेवारीला सुनावणी होती. ती न होता मंगळवारी (दि. 28) ठेवण्यात आली होती. मात्र, मंगळवारीही सुनावणी झाली नाही. आता 25 फेब्रुवारीची नवीन तारीख देण्यात आली आहे. त्यामुळे निवडणुकीची तारीख सतत पुढे ढकलली जात असल्याने माजी नगरसेवक व इच्छुकांची धाकधूक वाढली आहे.

पुढील महिन्यात सुनावणी न झाल्यास इच्छुकांचे टेन्शन आणखी वाढणार आहे. निवडणुकीसाठी मतदारयादी, प्रभागरचना, सुनावणी व हरकती तसेच इतर तयारी करेपर्यंत पावसाळा उजाडणार आहे. त्या काळात निवडणुका घेता येत नसल्याने त्या दिवाळीपर्यंत पुढे ढकलल्या जाऊ शकतात. त्यामुळे महापालिका निवडणूक दिवाळीनंतर होईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.




### ऐनवेळी पक्षांतराची तयारी

» महापालिकेत सध्या 128 माजी नगरसेवक होते. त्यातील अनेक नगरसेवकांनी प्रभागात सोयीच्या ठरणाऱ्या पक्षात प्रवेश केला आहे. लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकीच्या काळातही मोठ्या प्रमाणात पक्षांतर झाले आहे. त्यामुळे महापालिकेतील प्रत्येक पक्षाचे नगरसेवक बलाबल बदलले आहे. महापालिका निवडणुकीच्या तोंडावर अनेक जण पक्षांतराच्या तयारी आहेत. त्यादृष्टीने वरिष्ठ नेत्यांकडे मोर्चेबांधणी केली गेली आहे. सध्याचे माजी नगरसेवक तसेच इच्छुक ऐन महापालिका निवडणुकीच्या वेळेत कोणत्या पक्षाकडून लढतील, हे त्याच वेळी स्पष्ट होणार आहे.

### आठ वर्षांनंतर निवडणूक होणार

» फेब्रुवारी 2017 नंतर पिंपरी-चिंचवड महापालिकेची निवडणूक झालेली नाही. शहरात चारसदस्यीय 32 प्रभागांत एकूण 128 नगरसेवक होते. मुदतीमध्ये निवडणूक न झाल्याने महापालिका 12 मार्च 2022 रोजी बरखास्त झाली. महापालिकेत 13 मार्च 2022 पासून प्रशासकीय राजवट लागली आहे. अद्याप प्रशासकीय राजवट कायम आहे. 20 नोव्हेंबर 2024 ला झालेल्या विधानसभा निवडणुकीत शहरात एकूण 16 लाख 63 हजार मतदार होते. त्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

# खेड तहसील कार्यालयावर वकील धडकले; नायब तहसीलदारांचा नोंदवला निषेध

**वकील संघटनेचे ज्येष्ठ सदस्य ॲड. विलास काळे आणि निवासी नायब तहसीलदार मदन जोगदंड यांच्यात चार दिवसांपूर्वी हमरीतुमरी झाली होती.**

**पुणे | प्रतिनिधी**

खेडचे निवासी नायब तहसीलदार यांनी केलेले बेजबाबदार वक्तव्य आणि गैरवर्तणुकीच्या विरोधात खेड वकील बार असोशिएशनच्या वतीने प्रांत अधिकारी, खेड तहसीलदार कार्यालयावर गुरुवारी (दि.30) निषेध मोर्चा काढला. या निषेध मोर्चामध्ये मोठ्या संख्येने वकील सहभागी झाले होते.



वकील संघटनेचे ज्येष्ठ सदस्य ॲड. विलास काळे आणि निवासी नायब तहसीलदार मदन जोगदंड यांच्यात चार दिवसांपूर्वी हमरीतुमरी झाली होती. पोलिसांना बोलावण्यात आले होते. दोन्ही बाजूकडून पोलिसांत जाण्यापर्यंत वाद झाला होता. या घटनेनंतर वकील संघटना आक्रमक झाली. यापूर्वीही खेडचे प्रांत कट्यारे, तहसीलदार बेडसे यांच्या कामकाजाच्या विरोधात वकिलांमध्ये नाराजी होती. त्यावेळीही निषेध मोर्चा काढण्यात आला होता.

त्यानंतर तहसीलदार ज्योती देवरे यांच्यात आणि वकिलांसोबत वादावादी झाली होती. आताही वकील आणि निवासी नायब तहसीलदार यांच्यात संघर्ष झाला आहे. वकील आणि निवासी नायब तहसीलदार यांच्यात झालेल्या वादावादीनंतर वकील संघटना आक्रमक झाली. खेडचे निवासी नायब तहसीलदार यांनी केलेले बेजबाबदार वक्तव्य आणि गैरवर्तणूकीच्या विरोधात उपविभागीय अधिकारी (प्रांत) कार्यालय, खेड तहसीलदार कार्यालयावर गुरुवारी निषेध मोर्चा काढत महसुली न्यायालयामध्ये गुरुवारी (दि. 30) व शुक्रवारी (दि. 31) असा दोन दिवस कामकाजावर वकिलांनी बहिष्कार टाकला आहे.

निवासी नायब तहसीलदारांचे तात्काळ निलबंन करावे निलंबन कारवाई न केल्यास तीव्र स्वरुपाचे आंदोलन करण्याचा इशारा खेड वकील बार असोसिएशनच्या वतीने देण्यात आला. मागण्यांचे निवेदन नायब तहसीलदार मनीषा खैरे यांनी निवेदन स्वीकारले. या निषेध आंदोलनात खेड बार असोसिएशनचे सर्व पदाधिकारी सदस्य सहभागी झाले होते. खेडचे निवासी नायब तहसीलदार यांनी केलेले बेजबाबदार वक्तव्य आणि गैरवर्तणूकीच्या विरोधात उपविभागीय अधिकारी (प्रांत) कार्यालय, खेड तहसीलदार कार्यालयावर गुरुवारी निषेध मोर्चा काढत महसुली न्यायालयामध्ये दोन दिवस कामकाजावर वकिलांनी बहिष्कार टाकला आहे. बेजबाबदार वक्तव्य आणि गैरवर्तणुकीच्या विरोधात खेड वकील बार असोशिएशनच्या वतीने प्रांत अधिकारी, खेड तहसीलदार कार्यालयावर) निषेध मोर्चा काढला. या निषेध मोर्चामध्ये मोठ्या संख्येने वकील सहभागी झाले होते.

> नायब तहसीलदार यांनी वकिलांबाबत गैरवर्तन केले त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे यापूर्वीही वकिलांसोबत यापूर्वीचे तहसीलदार, प्रांत अधिकारी यांनी वाद घातले होते. वकिलांचे म्हणणे ऐकून घेतले जात नाही. पक्षकार आणि वकिलांना चांगली वागणूक दिली जात नाही. गैरवर्तन करणाऱ्या अशा अधिकाऱ्यांचे निलंबन करावे, त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे.
>
> **- ॲड. रोहिदास टाकळकर, अध्यक्ष, खेड बार असोसिएशन**

> खेड तहसीलदार यांच्या पुढे तारखा होत्या. आम्ही हजर होतो; मात्र त्या दिवशी त्या झाल्या नाहीत. त्या दिवशी तहसीलदार नव्हते. पक्षकार बसून ठेवले होते म्हणून निवासी नायब तहसीलदार जोगदंड यांनी तहसीलदार नाहीत तारखा होणार नाहीत हे सांगायला पाहिजे होते. हे न सांगताना पक्षकारांना बसवून ठेवले. त्याबाबत जाब विचारला असता त्यांनी अरेरावी केली. शूटिंग करून घेत होते. मी वकील असताना माझ्याशी गैरवर्तन केले.
>
> **- ॲड. विलास काळे, ज्येष्ठ विधिज्ञ**

> काही दिवसांपूवी वकीलपत्र दाखल करताना तहसीलदारांनी नकार दिला. त्यावेळी तीन तास हुज्जत घातली होती. पोलीस बोलावले होते. वकील सर्वसामान्य नागरिकांचा आवाज आहे. मात्र अधिकारी पोलिसांना पाचारण करून दबाव आणण्याचा प्रयत्न करीत आहे. अधिकाऱ्यांचा मस्तवालपणा, मनमानी, अरेरावी कदापि सहन करणार नाही. भ्रष्ट अधिकाऱ्यांचा मुजोरपणा वाढला आहे. त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे.
>
> **- ॲड. विलास काळे, ज्येष्ठ विधिज्ञ**

# पौड-दारवली रस्त्याचे काम बंद पाडले; ग्रामस्थांकडून उत्तम दर्जाच्या कामाची अपेक्षा

**नवीन तयार होत असलेल्या रस्त्याला ठेकेदार कडून मातीमिश्रित, निकृष्ट खडीचा वापर करण्यात असून सदर काम दारवली ग्रामस्थांनी बंद पाडले आहे**

**पुणे | प्रतिनिधी**

नवीन तयार होत असलेल्या पौड ते दारवली या रस्त्याला ठेकेदार कडून मातीमिश्रित अशी निकृष्ट खडीचा वापर करण्यात असून सदर काम दारवली ग्रामस्थांनी बंद पाडले आहे.



पौड ते अंबडवेट असा नऊ किलोमीटरचा असलेल्या रस्त्यावर अंबडवेट ते दारवली येथील मरीआई मंदीरापर्यंत निधी पडून हा रस्ता तयार करण्यात आला; मात्र दारवली येथील मरीआई मंदीर ते पौड हा तीन किलोमीटरचा रस्ता निधीअभावी झाला नव्हता. विधानसभा निवडणुकीपूर्वी या रस्त्याला तत्कालीन आमदार संग्राम थोपटे यांनी निधी उपलब्ध करून दिला. विधानसभेपूर्वीच या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजनही पार पडले होते. गेली एक महिन्यापासून पौडकडून रस्त्याच्या कामाला सुरूवात झाली. ठेकेदाराने अगोदर खडी टाकलेली असून साइडपट्ट्याही वाढविण्यात येत आहेत. हा रस्ता पहिल्या पेक्षा रूंद होणार आहे; मात्र टाकण्यात येत असलेल्या खडीत मोठ्या प्रमाणात माती असल्याचे ग्रामस्थांना आढळून आल्याने हे काम दारवली ग्रामस्थांनी बंद पाडले आहे.

तसेच टाकण्यात आलेल्या दिड किलोमीटरच्या खडीतून मोठ्या प्रमाणात धुराळा उडत असून दुचाकीचालकांना आपली वाहने चालविणेही कठीण झालेले आहे. पांगविलेल्या खडीतून वाहने चालविणे अवघड झाले आहे. हा रस्ता दिड ते दोन वर्षापूर्वीच झाला होता; मात्र तो पुन्हा खराब झाला आहे. तरी ठेकेदाराने या रस्त्यासाठी चांगल्या दर्जाचे साहित्य वापरावे तरच काम चालू करावे अशी मागणी उपसरपंच मंगेश बलकवडे, सामाजिक कार्यकर्ते तेजस थरकुडे, प्रदीप बलकवडे, सचिन ठोंबरे यांनी केली आहे.

> अबंडवेट, दारवली, पौड हा रस्ता महत्त्वाचा तसेच वर्दळीचा रस्ता असून या रस्त्याचे काम चांगल्या दर्जाचे व्हावे. पौड ते दारवली रस्त्यावर निकृष्ट काम सुरू आहे. याकडे बांधकाम विभागाचे दुर्लक्ष आहे. यारस्त्याचे काम हे चांगल्या प्रतीचे करण्यात यावे.
>
> **- अमोल धनवे, भाजपा मुळशी तालुका उपाध्यक्ष**

> पौड-अंबडवेट रस्त्यावर सुपरवायझर नसताना ड्रायव्हरने चुकून मुरुमाची गाडी साइडपट्टीवर न टाकता अलीकडेच टाकली असल्याने गैरसमज निर्माण झाला आहे. या रस्त्याबाबत चांगल्या प्रतीचे काम करण्याबाबत संबंधित ठेकेदाराला सूचना देऊन त्यांना तसे पत्र देण्यात आले आहे.
>
> **- मधुकर भिंगारदिवे, उपअभियंता मुळशी**